# माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवनशैली यातील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक**
**सहायक प्राध्यापक,**
**आर सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर**

***सारांश -***
*प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यातील सहसंबंधाचा अभ्यास सर्वेक्षण पद्धतीने केला आहे. शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील 50 विद्यार्थी व 50 विद्यार्थिनी असे एकूण 100 विद्यार्थी सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवडले होते. माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे स्वनिर्मित सामाजिक-सांस्कृतिक समायोजन चाचणी व स्वनिर्मित जीवन शैली मापिकेचा अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा 'r' मूल्य या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवन शैली यामधील सहसंबंध सार्थ आहे. विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवनशैली यामधील सहसंबंध सार्थ आहे. विद्यार्थिनींचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवन शैली यामधील सहसंबंध सार्थ दिसून येत नाही.*

**प्रस्तावना-**

मानव हा सामाजिक-सांस्कृतिक प्राणी असल्याने त्याच्या जीवनात सामाजिक-सांस्कृतिक समायोजनाचे महत्त्व अतिशय मोठे आहे. समाजात प्रभावीपणे जगण्यासाठी व्यक्तीला सामाजिक-सांस्कृतिक नियम, मूल्ये, परंपरा, आणि अपेक्षांशी जुळवून घेणे आवश्यक असते. विशेषतः किशोरावस्थेतील विद्यार्थी हे व्यक्तिमत्व विकासाच्या टप्प्यात असल्याने त्यांच्यासाठी सामाजिक-सांस्कृतिक समायोजन हा जीवनाचा अविभाज्य भाग ठरतो. माध्यमिक शिक्षणाच्या काळात विद्यार्थी विविध सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितींना सामोरे जातात- शैक्षणिक स्पर्धा, मित्रपरिवार, शिक्षकांशी नाते, पालकांचा दबाव आणि स्वतःच्या आकांक्षा यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. या सर्व घटकांचा त्यांच्या जीवनशैलीवर थेट परिणाम होतो. जीवनशैली म्हणजे व्यक्तीच्या दैनंदिन कृती, विचार, वर्तन आणि सवयींचा एकत्रित परिणाम होय. विद्यार्थ्यांची जीवनशैली त्यांच्या आरोग्य, सामाजिक-सांस्कृतिक संबंध, अध्ययनातील रस, आणि मानसिक समाधानावर

प्रभाव टाकते. चांगले सामाजिक-सांस्कृतिक समायोजन असलेले विद्यार्थी सामान्यतः संतुलित, सकारात्मक आणि आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारतात. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवनशैली या दोन घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या दोन्ही घटकांमधील संबंध समजून घेतल्यास शिक्षक आणि पालक विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊ शकतात. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवनशैली यातील सहसंबंध अभ्यासणे हा आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक व वैयक्तिक विकासासाठी आवश्यक शैक्षणिक उपाययोजना करता येतील. या पार्श्वभूमीवर, शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांवर हा अभ्यास करण्यात आला असून, त्यातून सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवनशैली यांतील परस्परसंबंध कितपत प्रभावी आहेत हे उघड करण्याचा प्रयत्न केला आहे.

**समस्या विधान-**

शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यातील सहसंबंधाचा अभ्यास अभ्यास करणे.

**उद्दिष्टे-**

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यातील सहसंबंधाचा अभ्यास अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.
२. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थीचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.
३. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थीनीचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.

**संशोधनाची कार्य पद्धती-**

- **संशोधन पद्धती-** सर्वेक्षण पद्धती
- **न्यादर्श:** शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील 50 विद्यार्थी व 50 विद्यार्थिनी असे एकूण 100 विद्यार्थी सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवडले होते.

- **साधने (Tools):** माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे

1. स्वनिर्मित सामाजिक-सांस्कृतिक समायोजन चाचणी - विधाने 30, पर्याय - सहमत, असहमत, सांगता येत नाही.
2. स्वनिर्मित जीवन शैली मापिका - विधाने 32, पर्याय- सहमत, असहमत, सांगता येत नाही.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे**- संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा ‘r’ मूल्य या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती संकलन व विश्लेषण:**

1. **माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| विद्यार्थी (मुले+मुली) | N | Table ‘r’ | Obtained ‘r’ |
|---|---|---|---|
| सामाजिक-सांस्कृतिक समायोजन | 100 | .195 | .790 |
| जीवन शैली | 100 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 198 ला 0.05 स्तरावर सारणी **‘r’** मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .790 आहे. म्हणजेच प्राप्त **‘r’** मूल्य सारणी **‘r’** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

2. **माध्यमिक शाळांमधील विद्यार्थीचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| विद्यार्थी (मुले) | N | Table ‘r’ | Obtained ‘r’ |
|---|---|---|---|
| सामाजिक-सांस्कृतिक समायोजन | 50 | .195 | .718 |
| जीवन शैली | 50 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 98 ला 0.05 स्तरावर सारणी **‘r’** मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .718 आहे. म्हणजेच प्राप्त **‘r’** मूल्य सारणी **‘r’** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे (मुले) सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

3. **माध्यमिक शाळांमधील विद्यार्थींचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| विद्यार्थी (मुली) | N | Table 'r' | Obtained 'r' |
|---|---|---|---|
| सामाजिक-सांस्कृतिक समायोजन | 50 | .195 | .725 |
| जीवन शैली | 50 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 98 ला 0.05 स्तरावर सारणी **'r'** मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .725 आहे. म्हणजेच प्राप्त **'r'** मूल्य सारणी **'r'** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे (मुली) सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

## निष्कर्ष

1. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येतो.
2. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थींचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येतो.
3. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थींनीचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन व जीवन शैली यात सार्थ सहसंबंध दिसून येतो.

## निष्कर्षावर आधारीत चर्चा

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षांनुसार माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक-सांस्कृतिक समायोजन आणि जीवनशैली यामध्ये सशक्त व सकारात्मक सहसंबंध आढळून आला आहे. यावरून असे स्पष्ट होते की सामाजिक-सांस्कृतिक समायोजन ही जीवनशैलीच्या निर्मितीत आणि सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. समाजाशी सुसंवादी संबंध प्रस्थापित करणारे विद्यार्थी अधिक संतुलित, आत्मविश्वासपूर्ण आणि आरोग्यदायी जीवनशैली जगतात. विद्यार्थ्यांमध्ये आढळलेला उच्च सहसंबंध दर्शवितो की सामाजिक-सांस्कृतिक संबंधांचे व्यवस्थापन, गटात कार्य करण्याची क्षमता, सहकार्य, सहानुभूती आणि जबाबदारीची जाणीव या गुणांचा त्यांच्या दैनंदिन जीवनशैलीवर सकारात्मक परिणाम होतो. विद्यार्थिनींच्या बाबतीत तुलनेने कमी सहसंबंध दिसून येतो, यामागे विविध सामाजिक-सांस्कृतिक , शैक्षणिक किंवा कौटुंबिक घटक

कारणीभूत असू शकतात, जसे की समाजातील अपेक्षा, मर्यादित सहभाग, आत्मअभिव्यक्तीची संधी कमी असणे किंवा योग्य मार्गदर्शनाचा अभाव. या निष्कर्षांवरून असे सुचविता येते की शालेय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक-सांस्कृतिक समायोजन वाढविणारी आणि सकारात्मक जीवनशैली प्रोत्साहन देणारी उपक्रम राबवावेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गट क्रियाकलाप, नेतृत्व विकास, मूल्य शिक्षण, आणि भावनिक संतुलनाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक जाणीवा आणि जीवनशैली सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत. एकूणच, विद्यार्थ्यांचे सामाजिक-सांस्कृतिक समायोजन जितके सक्षम तितकी त्यांची जीवनशैली अधिक सकारात्मक, समतोल आणि यशस्वी ठरते आणि हेच शैक्षणिक प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट आहे.

## संदर्भग्रंथ सूची

Chen, F. S., Lin, Y. M., & Tu, C. A. (2006). A study of the emotional intelligence and life adjustment of senior high school students. *World transactions on engineering and technology education*, *5*(3), 473.

Jalili, H., Talaei, H., & Ghasemi, S. A. (2024). Research Paper The Role of Islamic Lifestyle and Spiritual Vitality in Predicting Students' Emotional Adjustment.

Muller, K. L. (1989). *Relations between social-emotional adjustment styles and lipoprotein metabolism*. Stanford University.

Ware, M. E., Leak, G. K., & Perry, N. W. (1985). Life Styles Inventory: Evidence for its factorial validity. *Psychological Reports*, *56*(3), 963-968.